पुण्यनगरी पृ.५ता.९.

# विनोद तावडे बविआच्या तावडीत!

## पैसे वाटल्याचा हितेंद्र ठाकूर यांचा आरोप | भाजपमधूनच खबर मिळाल्याचा सनसनाटी दावा



**वसई :** भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी नालासोपाऱ्यात येऊन पैसे वाटप केल्याच्या कथित घटनेवरून मंगळवारी सकाळी भाजप आणि बहुजन विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा राडा झाला. तावडे ५ कोटी रुपये वाटण्यासाठी घेऊन आले होते, भाजपमधूनच मला ही खबर मिळाली होती, असा धक्कादायक दावा करत आमदार हितेंद्र ठाकूर यांनी खळबळ उडवून दिली. तावडे यांनी या आरोपांचा इन्कार केला असून निवडणूक आयोगाला निष्पक्ष चौकशी करावी, असे आवाहन केले आहे.

मंगळवारी सकाळी नालासोपाऱ्यातील विवांता हॉटेलमध्ये या राड्याला सुरुवात झाली. भाजप उमेदवार राजन नाईक आणि कार्यकर्त्यांना तावडे मतदान प्रक्रिया आणि आक्षेप घेण्याबाबतच्या तरतुदी समजवून देत असताना अचानक बविआचे कार्यकर्ते हॉटेलमध्ये घुसले. त्यांनी तावडे यांच्या बॅगांवर झडप घातली. बॅगेत लॅपटॉप असल्याचे तावडे सांगत असतानाही तिथे तपासणी न करता या बॅगा कार्यकर्त्यांनी ताब्यात घेतल्या. नंतर पत्रकारही तिथे दाखल झाल्यावर त्यांच्या समोर या कार्यकर्त्यांनी काही नोटांचे लिफाफे फडकवत हा पैसा तावडे यांच्या गाडीत असलेल्या बॅगांमधून मिळाल्याचा दावा केला. तावडे या प्रकाराला आक्षेप घेत असताना या कार्यकर्त्यांनी त्यांना घेराव घालून गदारोळ करायला सुरुवात केली, तेव्हा तावडे यांनी हितेंद्र ठाकूर आणि क्षितिज ठाकूर यांना फोन करून बोलावून घेतले. लगोलग या घडामोडींचे व्हिडीओही व्हायरल करण्यात आले. तावडे यांच्याजवळ सापडलेल्या काळ्या बॅगेची पोलिसांसमक्ष तपासणी केल्यावर त्यात पाचशेच्या नोटा भरलेले खाकी लिफाफे सापडले, असा दावा ठाकूर पिता-पुत्रांनी केला. हितेंद्र ठाकूर यांनीही याप्रकरणी निवडणूक आयोगाने आणि पोलिसांनी कारवाई न केल्यास तावडेंना अडवून ठेवण्यात येईल, असे ठणकावले होते. ही बाब भाजप कार्यकर्त्यांना कळल्यावर त्यांनीही हॉटेल विवांताकडे कूच केली. दोन्हीकडील कार्यकर्ते आक्रमकपणे समोरासमोर आल्यावर तणाव निर्माण झाला होता.

### तावडे-ठाकूर एकाच गाडीतून रवाना

तावडे यांना तासभर अडवून ठेवत त्यांच्याकडे पैसे मिळाल्याचा दावा बविआचे कार्यकर्ते करत होते. प्रकरण मिटवा, अशी विनंती तावडे यांनी अनेकदा फोन करून केल्याचेही हॉटेलमध्ये आल्यावर हितेंद्र ठाकूर यांनी सांगितले. तावडे यांच्या गाडीच्या चाकातील हवा काढण्यात आल्यामुळे ते तिथून निघून जाऊ शकत नव्हते. अखेरीस, तावडेसाहेब कशाला असे करायचे, क्षितिज तर त्यांना काका म्हणतो, वगैरे भाषा करत हितेंद्र ठाकूर यांनी तावडे यांना आपल्याच गाडीतून अन्यत्र नेले.

### आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल

विनोद तावडे यांच्यावर आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### हा पूर्वनियोजित हल्ला - फडणवीस


विनोद तावडे आमचे राष्ट्रीय नेते आहेत. त्यांच्यावर आणि आमचे उमेदवार राजन नाईक यांच्यावर प्लॅन करून हल्ला झाला आहे. तावडे यांच्याकडे कुठलेही पैसे नव्हते आणि त्यांनी पैसे वाटलेले नाहीत, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. तावडे यांचा या प्रकरणात कोणताही दोष नाही, असे ते म्हणाले.

> माझ्यावर टीका करणाऱ्या राहुल गांधी यांनी स्वतः नालासोपाऱ्यात येऊन हॉटेलचे सीसीटीव्ही फूटेज तपासावे आणि पैसे आल्याचे सिद्ध करावे, असे आव्हान तावडे यांनी दिले आहे.

## भाताणे तलावात बुडून दोन तरुणांचा मृत्यू

**वसई :** विरार पूर्वेकडील भाताणे तलावात बुडून दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी रात्री घडली आहे. याप्रकरणी मांडवी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. यशवंत हाइट्स येथे राहणारे तुषार बेनगुडे आणि पवन बोडके हे दुचाकीवरून फेरफटका मारण्यासाठी निघाले होते. भाताणे गावातील बेलवाडी कुंडाजवळ आल्यावर त्यांना आंघोळ करण्याची इच्छा झाली. त्यामुळे त्यांनी कुंडात उडी घेतली. मात्र त्यांना पोहताही येत नव्हते आणि पाण्याच्या खोलीचाही त्यांना अंदाज नसल्यामुळे दोघे पाण्यात बुडाले.

## वीजचोरीचा ३१ जणांवर गुन्हा



**वसई :** वर्षभर विजेची चोरी होत असतानाही महावितरणाच्या कर्मचाऱ्यांना त्याची खबर नसल्याची आश्चर्यजनक बाब समोर आली आहे. तब्बल पावणेदोन लाखांची चोरी झाल्यावर त्यांचे डोळे उघडले आहेत. विरार पूर्वेकडील बरफपाड्याच्या चाळीत मोठ्या प्रमाणात वीजचोरी करण्यात येत होती. ३१ जण ही वीजचोरी १२ महिन्यांपासून करत होते. मात्र या चोरीकडे महावितरणाचे कर्मचारी काणाडोळा करत असल्याचे दिसून आले आहे. वीज पथकाने केलेल्या तपासणीत बरफपाड्यात ८ हजार ८११ युनिटची १ लाख ७७ हजार ३५० रुपयांची वीजचोरी करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी महावितरणचे सहायक अभियंता राजकुमार कल्लोळकर यांनी ३१ जणांविरोधात विरार पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहेत.

पुण्यनगरी पु.पा.७.

# पाच मतदारसंघांसाठी कडक पोलीस बंदोबस्त

## ■ १२ सहाय्यक पोलीस आयुक्त, ३८६ अधिकारी, निवडणूक शांततेत पार पाडण्याचे आदेश

**■ मीरा रोड :** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका जाहीर केल्या असून, १५ ऑक्टोबरपासून आदर्श आचारसंहिता लागू केली आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान व २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होणार आहे. मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे.




मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात पालघर जिल्ह्यात १३१ बोईसर, १३२ नालासोपारा, १३३ वसई व ठाणे जिल्ह्यात १४५ मीरा भाईंदर, १४६ ओवळा माजिवाडा असे एकूण पाच विधानसभा मतदारसंघ येतात. या मतदारसंघांमध्ये ४४९ इमारतीत १७७६ बूथ असून याठिकाणी मतदान प्रक्रिया होणार आहे.

पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात ५ पोलीस उपआयुक्त, १२ सहाय्यक पोलीस आयुक्त, ३८६ पोलीस अधिकारी, २८४० पोलीस अंमलदार, ८७ पोलीस सेक्टर व पेट्रोलिंग, १२५० होमगार्ड, सीआयएसएफ, एसएपीच्या ५ तुकड्या, एसआरपीएफची १ तुकडी व ८८ नागरी संरक्षण स्वयंसेवक असा पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे. तसेच पोलीस आयुक्तालय कार्यालय येथे पोलीस आयुक्त यांचे राखीव ३ स्ट्रायकिंग व परिमंडळ २ व ३ कार्यालय येथे प्रत्येकी १ स्ट्रायकिंग नेमण्यात आलेली आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात निवडणुक प्रक्रिया शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्याच्या उद्देशाने मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. तसेच योग्य तो पोलीस बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.

■ मागील निवडणुकीदरम्यान गुन्हे दाखल असणाऱ्या व्यक्तीवर योग्य ती कायदेशीर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच शहरात सामाजिक माध्यमातून संदेश प्रसारित होऊन समाजात तेढ निर्माण होणार नाही, यासाठी सायबर सेलची पथके तैनात करण्यात आली आहे. निवडणुकीदरम्यान एखादा अनुचित किंवा संशयित प्रकार नागरिकांचे लक्षात आल्यास तात्काळ नजीकचे पोलीस ठाणे किंवा पोलीस आयुक्तालयाचे नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक ०२२-३५००६१३०, २९४५२१३५ व ७०२११९५३५२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस आयुक्तालयाने केले आहे.

# तब्बल १३ लाख ७४ हजार मतदार बजावणार हक्क



**■ वसई :** वसई तालुक्यातील वसई-नालासोपारा आणि बोईसर मतदारसंघामधील तब्बल १३ लाख ७४ हजार ५०७ मतदार बुधवारी मतदानाचा हक्क बजावणार आहेत. वसई या जुन्या मतदारसंघात १ लाख ८१ हजार ८९८ पुरुष, १ लाख ७२ हजार ७४२ महिला आणि १२ इतर मतदारांचा समावेश आहे. नालासोपारा मतदारसंघात ३ लाख २६ हजार ५२२ पुरुष, २ लाख ८१ हजार ८८४ महिला आणि १२० इतर मतदारांचा समावेश आहे. तसेच बोईसर मतदारसंघात २ लाख २२ हजार २६४ पुरुष, १ लाख ८९ हजार २२ महिला आणि ४३ इतर मतदारांचा समावेश आहे. हे सर्व मतदार बुधवारी मतदान करणार आहेत. त्यानंतर २३ नोव्हेंबरला जी. जी. कॉलेजमध्ये वसई, ग्लोबल सिटीतील समर्थ इंटरनॅशनल शाळेत, नालासोपारा आणि बोईसरच्या टिमामध्ये बोईसर मतदारसंघात मतमोजणी होणार आहे.

लोकसत्ता पा.नं.५

# मराठा आरक्षणाचा नवा कायदा वेगळा कसा?

## उच्च न्यायालयाची सरकारला विचारणा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मराठा आरक्षण रद्द ठरवताना सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या स्पष्टीकरणाचा हवाला देत 'आता अशी काय असाधारण स्थिती निर्माण झाली की राज्य सरकारला मराठा समाजाला शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास ठरवण्यासाठी नवा आयोग स्थापन करावा लागला,. अशी विचारणा उच्च न्यायालयाने मंगळवारी राज्य सरकारला केली. तसेच मराठा समाजाला सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात आरक्षण देणारा कायदा आणि आता नव्याने केलेला कायदा यात नेमके काय वेगळेपण आहे किंवा तो एकमेकांपेक्षा वेगळा कसा? असा प्रश्नही न्यायालयाने केला.

मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद संपल्यानंतर राज्य सरकारच्या वतीने राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी मंगळवारी युक्तिवादाला सुरुवात केली. त्या वेळी, मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय, न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती फिरदोश पुनीवाला यांच्या विशेष पूर्णपीठाने महाधिवक्त्यांकडे उपरोक्त विचारणा करून त्याबाबत प्रामुख्याने युक्तिवाद करण्याची सूचना केली.

न्यायालयाच्या प्रश्नावर सरकारला आरक्षण देण्याचा अधिकार नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने कुठेही म्हटलेले नाही.



### संपूर्ण समाज पुढारलेला म्हणता येणार नाही

- **एखाद्या राज्याला विशिष्ट समाजाचे बरेच मुख्यमंत्री लाभले म्हणून तो संपूर्ण समाज पुढारलेला आहे, असे म्हणता येणार नाही.**
- **त्याचप्रमाणे, महाराष्ट्राला मराठा समाजाचे अनेक मुख्यमंत्री लाभले म्हणून मराठा समाजही पुढारलेला आहे असे म्हणता येणार नाही, असा युक्तिवाद राज्य सरकारच्या वतीने करण्यात आला.**
- **राज्याला आतापर्यंत मराठा मुख्यमंत्री लाभले आहेत. त्यात विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचाही समावेश आहे.**

तर, लोकसंख्येच्या आधारे निवृत्त न्यायमूर्ती एम. जी. गायकवाड यांच्या मागासवर्ग आयोगाने मराठा समाजाला मागास ठरवण्यावर आणि त्याला आरक्षण देण्याची शिफारस केल्यावर सर्वोच्च न्यायालयाने निकालात बोट ठेवले होते. शिवाय, मराठा समाज सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास असल्याचे सरकार सिद्ध करू शकले नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने *(पान ४ वर)*

लोकमत पु.पा.३.

# गृहसंकुलात क्रिकेटवरून राडा; एकमेकांना मारहाण

## चार रहिवाशांवर पोलिसांत गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोड मधील आलिशान व सुशिक्षित वस्तीच्या समजल्या जाणाऱ्या एमआयसीएल आराध्या हायपार्क या गृहसंकुलात क्रिकेटवरून रहिवाशांमध्ये झालेल्या राड्यात एकाचे नाक व डोळा फ्रॅक्चर केल्याप्रकरणी चार जणांवर काशिमीरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मीरा रोडच्या मुंबई-अहमदाबाद महामार्गावर ठाकूर मॉलच्या मागे एमआयसीएल आराध्या हायपार्क हे आलिशान गृहसंकुल आहे. या गृहसंकुलातील रहिवाशांमध्ये आपसात क्रिकेट प्रीमियर लीगचे संघ तयार केले होते. येथील डी विंगमध्ये राहणारे रहिवासी सुरेंद्र थांधिया (वय ४१) यांनी काशिमीरा पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, क्रिकेट लीगच्या टीममध्ये खेळण्यासाठी थांधिया व त्यांच्या मित्राने ५ हजार रुपये भरले होते. कमिटी मेंबर यांनी तयार केलेला एकाच लीगमध्ये सहभागी होण्याचा निर्णय हा अन्यायकारक असल्याचे थांधिया यांनी सांगितले. त्यावरून ते त्यांचा मित्र आणि कमिटी मेंबरमध्ये वाद सुरू होता.



### कायदा,सुव्यवस्था बिघडू नये म्हणून दिली समज

- थांधिया हे संकुलातील टेनिस ग्राउंड येथे रात्री क्रिकेट बघत बसले असताना, चिराग सुतार व कमिटी मेंबर यांनी त्यांना गेटच्या बाहेर चला असे म्हटले असता थांधिया यांनी बाहेर जाण्यास नकार देत इकडेच चर्चा करा असे सांगितले. त्याचा राग येऊन चिरागसह निखिल जांबुळकर, प्रदीप घाडगे, उमेश नायर यांनी संगनमत करून थांधिया यांना ठोशाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ व दमदाटी केली.
- मारहाणीत थांधिया यांच्या नाकाला व डोळ्याला मार लागून फ्रॅक्चर झाले. पोलिसांनी चिराग, निखिल, नायर व घाडगे या चौघांवर गुन्हा दाखल केला आहे. पोलिस याप्रकरणी अधिक तपास करत असून रहिवासी यांच्यातील राड्यानंतर कायदा व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून पोलिसांनी समज दिली आहे.

लोकमत पु. पा. ३.



मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलिस आयुक्तालय हद्दीत येणाऱ्या पाच विधानसभा मतदारसंघात शांततेत व सुरळीतपणे निवडणूक प्रक्रिया पार पडावी, याविषयी सूचना देण्यासाठी पोलिसांची बैठक आयोजिली होती. (छाया : धीरज परब).

# मतदान शांततेत व्हावे म्हणून आयुक्तालयातील पोलिस सज्ज

## पाच मतदारसंघांत बंदोबस्तासह विविध उपाययोजना

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत तीन विधानसभा मतदारसंघ पूर्ण तर दोन मतदारसंघांचा निम्मा भाग येतो. त्यामुळे २० नोव्हेंबरच्या मतदानासाठी पोलिस आयुक्तालय सज्ज झाले आहे.

पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत मीरा भाईदर, वसई व नालासोपारा हे तीन विधानसभा क्षेत्र पूर्णपणे येतात, तर ओवळा-माजिवडाचा भाग मीरा-भाईदर शहरात येतो, तसेच बोईसरचा भाग हा मांडवी पोलिस ठाण्याच्या हद्दीत येतो. या विधानसभा क्षेत्रातील मतदान, निवडणूक शांततेत पार पाडावी, यासाठी पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी कर्मचाऱ्यांना सूचना केल्या. तर आयुक्त तसेच अपर पोलिस आयुक्त दत्तात्रय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्त, विविध उपाययोजनांचे नियोजन केले गेले.

### अनुचित प्रकार घडल्यास करा संपर्क

पोलिस आयुक्तालय कार्यक्षेत्रात निवडणूक प्रक्रिया शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्याच्या उद्देशाने मनाई आदेश जारी केले आहेत. मागील निवडणुकीदरम्यान गुन्हे दाखल असणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. तर शहरात सोशल मीडियाच्या माध्यमातून तेढ निर्माण करणारे वादग्रस्त संदेश प्रसारित करणाऱ्यांवर कारवाई तसेच नजर ठेवण्यासाठी सायबर सेलची पथके तैनात केली आहेत. एखादा अनुचित किंवा संशयित प्रकार लक्षात आल्यास तत्काळ नजीकचे पोलिस ठाणे, नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक ०२२-३५००६१३०, २९४५२१३५ व ७०२११९५३५२ यावर संपर्क साधण्याचे नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे.

आयुक्तालयातील पाच विधानसभा मतदारसंघात ४४९ इमारतीत १,७७६ मतदान बूथ आहेत. पोलिस आयुक्तालयात कार्यक्षेत्रात पाच पोलिस उपआयुक्त, १२ सहायक पोलिस आयुक्त, ३८६ पोलिस अधिकारी, २,८४० पोलिस अंमलदार, ८७ पोलिस सेक्टर व पेट्रोलिंग, १,२५० होमगार्ड, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल व विशेष सशस्त्र पोलिस दलाच्या पाच कंपनी, राज्य राखीव पोलिस दलाची १ तुकडी व ८८ नागरी संरक्षण स्वयंसेवक असा पोलिस बंदोबस्त आहे. आयुक्तालय कार्यालय येथे पोलिस आयुक्त यांचे राखीव तीन स्ट्रायकिंग व परिमंडळ २ व ३ कार्यालय येथे प्रत्येकी १ स्ट्रायकिंग नेमले आहे. मतदानाच्या दिवशी कशा प्रकारे जबाबदारी पार पाडावी याचे मार्गदर्शन केले.

लोकमत पु. पा. २.

# मीरा-भाईंदर मतदारसंघात ५०३ केंद्रे मतदानासाठी सज्ज

## तिरंगी लढत होणार : साडेतीन हजार अधिकारी व कर्मचारी तैनात

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर मतदारसंघात ५०३ मतदान केंद्रे २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदानासाठी सज्ज करण्यात आली आहेत; तर या केंद्रांवर सुमारे साडेतीन हजार अधिकारी व कर्मचारी तैनात केले गेले आहेत.

मीरा-भाईंदर मतदारसंघात एकूण ५,१०,८६२ मतदार आहेत. त्यांत २,६७,७८५ पुरुष, तर २,४३,०७२ महिला मतदार आहेत. पाच इतर मतदार आहेत. लोकसभा निवडणुकीवेळी या मतदारसंघात ४५१ मतदान केंद्रे होती, जी विधानसभा निवडणुकीसाठी वाढवली आहेत. यंदा मतदानासाठी ९९ ठिकाणी ५०३ मतदान केंद्रे आहेत.

प्रत्येक मतदान केंद्रात १ कंट्रोल युनिट व प्रत्येकी १ व्हीव्हीपॅट यंत्र, तर उमेदवार जास्त असल्याने प्रत्येकी २ बॅलेट युनिट असतील. याशिवाय प्रत्येकी १०० कंट्रोल आणि बॅलेट युनिट तसेच १५० व्हीव्हीपॅट यंत्रे राखीव आहेत. प्रत्येक केंद्रात १ केंद्रस्तरीय अधिकारी, ३ मतदान अधिकारी, १ शिपाई व पोलिस असेल. मंगळवारी अतिरिक्त जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी मनीषा जायभाये यांनी काही मतदान केंद्रांची पाहणी करून नियोजनाचा आढावा घेतला. मतदान केंद्रात दिव्यांगांसाठी रॅम्प, पिण्याचे पाणी, मार्गदर्शक, प्रतीक्षा कक्ष, आरोग्यपथक, महिलांसाठी हिरकणी कक्ष, आदी सुविधा केल्या गेल्या आहेत.



मीरा-भाईंदर मतदारसंघात ५०३ मतदान केंद्रे २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदानासाठी सज्ज करण्यात आली आहेत; तर या केंद्रांवर सुमारे साडेतीन हजार अधिकारी व कर्मचारी तैनात केले गेले आहेत.

### या केंद्रात केवळ महिला अधिकारी - कर्मचारी

मीरा रोडच्या ४१९ क्रमांकाच्या एपी इंटरनॅशनल शाळेतील मतदान केंद्रात केवळ महिला अधिकारी आणि महिला कर्मचारी तसेच महिला पोलिसच तैनात केले आहेत. या केंद्रातील मतदानाची संपूर्ण प्रक्रिया महिलाच हाताळणार आहेत.

### दिव्यांग व ८५ वर्षांवरील वृद्धांना वाहनाची सोय

सक्षम ॲपवर दिव्यांग आणि ८५ वर्षांवरील वृद्ध मतदारांनी नोंदणी केल्यास मतदानासाठी त्यांच्या घरी वाहन पाठवले जाईल. त्या वाहनाने मतदान केंद्रावर नेऊन मतदान झाल्यावर पुन्हा घरी वाहनाने सोडले जाणार आहे.

### गृहसंकुलात मतदान केंद्र

मीरा रोडच्या सृष्टी गृहसंकुलात १० मतदान केंद्रे उभारली आहेत. भाईंदरच्या नगर भवनशेजारील सालासर संकुलात तसेच अन्य चार गृहसंकुलात मतदान केंद्रे उभारली असून, तेथील मतदारांना मतदानासाठी अन्यत्र जावे लागणार नाही.

### स्वच्छ मतदान केंद्राचा प्रयत्न

शहरातील सर्व मतदान केंद्रांची विशेष साफसफाई मोहीम राबवून स्वच्छता करण्यात आली. मतदान केंद्र स्वच्छ व सुंदर वातावरणात करण्याचा प्रयत्न केला आहे. मतदान केंद्रात व शौचालयालगतचे गटार येथे निर्जंतुकीकरण पावडर टाकली आहे.

### मतदारांनी काय करावे?

- रांगेमध्ये उभे राहावे व शांतता राखावी. निवडणूक आयोगाने मान्यता दिलेले छायाचित्र ओळखपत्र दाखवावे. मतदान कसे करावे याबाबत सूचनांचे पालन करावे. मतदान केंद्रातील कर्मचाऱ्यांसोबत सौजन्याने वागावे. अधिक माहिती शासनाच्या टोल फ्री क्रमांक १९५० वर संपर्क केल्यास मिळेल.

### मतदान केंद्रात काय करू नये?

- मतदान करण्याच्या बदल्यात लाच घेणे, तोतयेगिरी करणे हा गुन्हा आहे. मतदान प्रक्रियेमध्ये अडथळा आणू नये. मतदान साहित्याला नुकसान पोहोचवू नये. मतदान केंद्रात थुंकणे व घाण पसरवणे, मोबाइल नेणे, धूम्रपान करणे, शस्त्र नेणे, छायाचित्र घेण्यास मनाई आहे.



## मीरा रोडमधून सराईत चोरट्यास अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर पोलिस आयुक्तालय हद्दीसह मुंबई, गुजरात, सातारा, डहाणू आदी भागांत २४ गुन्हे दाखल असलेल्या सराईत आरोपीला मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. या आरोपीने केलेले चोरीचे ५ गुन्हे उघड करून पोलिसांनी त्याच्याकडून ३ दुचाकी व अन्य मुद्देमाल हस्तगत केला आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलिस उपनिरीक्षक हितेंद्र विचारे यांना योगेश जयस्वाल हा सराईत गुन्हेगार मीरारोडच्या कनकिया, तिवारी महाविद्यालयाजवळच्या ओस्तवाल ऑर्चिड बिल्डिंग येथे येणार असल्याची माहिती मिळाली होती. विचारेसह सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय सरक, तसेच महेश वेल्हे, हनुमंत सूर्यवंशी, संग्रामसिंग गायकवाड, साकेत माघाडे अशा पोलिस पथकाने सापळा रचून योगेश बाबूलाल जयस्वाल (३१, रा. बेस्ट बस डेपोजवळ, अंधेरी पश्चिम) याला ताब्यात घेतले. योगेश हा मूळचा गुजरातच्या साबरकांठाच्या मोडासा गावचा आहे. पोलिसांच्या तपासात त्याच्यावर आचोळे, डहाणू, कफ परेड, चर्चगेट आणि उमरगाव गुजरात येथील प्रत्येकी १, असे ५ गुन्हे उघडकीस आले आहेत.

पुढारी पा. नं-३.

# मिरा-भाईंदरमध्ये ५ लाख १० हजार मतदार बजावणार मतदानाचा अधिकार

## ९९ ठिकाणी ५०३ मतदार केंद्र सज्ज

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर विधानसभा मतदार संघात एकूण ५ लाख १० हजार ८६२ मतदार मतदानाचा हक्क बजाविणार असून त्यासाठी ९९ ठिकाणी ५०३ मतदान केंद्रे सज्ज ठेवण्यात आली आहेत.

यंदाच्या निवडणुकीत एकूण ५३ हजार ४९० नवीन मतदारांची नोंद करण्यात आली असून त्यात १८ ते ४० वयोगटातील मतदारांचा सर्वाधिक समावेश आहे. तर एकूण ५ लाख १० हजार ८६२ मतदारांमध्ये केवळ ५ तृतीयपंथी मतदारांचा समावेश असून गेल्या विधानसभा निवडणुकीत एकूण मतदारांची संख्या ४ लाख ५७ हजार ३६७ इतकी होती. त्यापैकी ४८.४१ टक्के मतदारांनी मतदान केले होते. यंदाच्या निवडणुकीत एकूण १७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून त्यासाठी एकूण ९९ ठिकाणी ५०३ मतदान केंद्रे सज्ज ठेवण्यात आली आहेत. यापैकी १६१ मतदान केंद्रे मंडपात तयार करण्यात आली असून याठिकाणी मतदान करण्यासाठी येणाऱ्या मतदारांच्या सोयीसाठी ४२ स्वच्छतागृहे ठेवण्यात आली आहेत.

मतदार संघातील सर्वच मतदान केंद्रांवर यंदा मिनरल वॉटरची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून प्रत्येक मतदान केंद्रावर मतदार सहाय्यता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. यंदा ८५ वर्षे वयोगटावरील वृद्ध तसेच दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रांवर आणण्यासह त्यांना पुन्हा घरी सोडण्याकरिता १५० व्हीलचेअर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मात्र त्यासाठी मतदार सहाय्यता कक्षाला आगाऊ सूचना देणे आवश्यक करण्यात आले आहे.

पहिल्यांदा प्रत्येक मतदान केंद्रावर हिरकणी कक्षाची व्यवस्था करण्यात आली असून आपत्कालीन परिस्थितीसाठी वैद्यकीय पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदारांची नावे शोधण्यासह त्यांना मतदान केंद्रांची माहिती देण्याकरिता प्रत्येक केंद्रावर एका बूथ लेव्हल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली असून प्रत्येक केंद्रात प्रत्येकी १ केंद्रस्तरीय, मतदान अधिकारी १ व २ तसेच शिपायाची नियुक्ती करण्यात आली आहे. यासह अन्य चोख व्यवस्था मतदान कें द्रावर करण्यात आली आहे.

### ६० क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नियुक्ती

प्रत्येकी ६० क्षेत्रीय व सहाय्यक क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून एकूण ५ लाख १० हजार ८६२ मतदारांना मतदान करण्यासाठी एकूण १ हजार २०६ मतदान यंत्रे, ६०३ कंट्रोल युनिट व ६५३ व्हीव्हीपॅट मशीन तैनात ठेवण्यात आल्या आहेत. यावर निवडणूक निर्णय अधिकारी सुनील भुताळेंसह, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राजकुमार घरत, कल्पिता पिंपळेव नायब तहसीलदार प्रदीप मुकणे यांच्यामार्फत नियंत्रण ठेवण्यात येत आहे.

# मिरा-भाईंदरमधील मतदान केंद्रांची अधिकाऱ्यांकडून पाहणी

## मतदानासाठी तीन विशेष मतदान केंद्रांची निर्मिती

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**



१४५ मिरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघात ५०३ केंद्रांवर प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्या अनूषंगाने अतिरीक्त जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी मनीषा जायभाये यांनी १४५ मिरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांसह त्यातील सोईसुविधांची मतदानाच्या पूर्वसंध्येला पाहणी केली. यंदा महिलांसह दिव्यांग व युवा मतदान केंद्रांची प्रथमच निर्मिती करण्यात आली असून त्यांची देखील पाहणी करण्यात आली.

या तीन विशेष मतदान केंद्रांमध्ये भाईंदर पश्चिमेकडील अवर लेडी ऑफ वेलंकनी स्कुलमधील मतदान केंद्र क्रमांक ६४ मध्ये दिव्यांग मतदान केंद्र, ए.पी.इंटरनॅशनल स्कुलमधील मतदान केंद्र क्रमांक ४१९ मध्ये महिला मतदान केंद्र व एस. एल. पोरवाल इंग्लिश हायस्कुलमधील मतदान केंद्र १९५ मध्ये युवा मतदान केंद्राचा समावेश आहे. मतदान केंद्र क्रमांक ४१९ मधील महिला मतदान केंद्रात सर्व अधिकारी व कर्मचारी म्हणून महिलांचीच नियुक्ती करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या सक्षम पद्वारे वृद्ध व दिव्यांग मतदारांना त्यांच्या निवासस्थानापासून मतदान केंद्रावर आणणे व मतदानानंतर पुन्हा निवासस्थानी पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. तरी मिरा-भाईंदर विधानसभा मतदार संघातील जास्तीतजास्त वृद्ध व दिव्यांग मतदारांनी सक्षम पवर नोंदणी करून त्याचा लाभ घ्यावा तसेच या मतदारसंघातील जास्तीतजास्त मतदारांनी मतदान करावे. असे आवाहन असे आवाहन मिरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सुनील भुताळे यांनी केले आहे. तर तीन विशेष मतदान केंद्रांसह मीरारोड येथील शांतीनगर हायस्कूल मधील मतदानं केंद्रांना देखील जायभाये यांनी भेट देत मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना निवडणुकीच्या कामकाजाबाबत त्यांनी महत्वाच्या सूचना केल्या.

लोकमत पु.पा.२.

# वसई, नालासोपारा, बोईसरसाठी नाक्यांवर, चौकांत पोलिस तैनात

## प्रशासन सज्ज : कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी बंदोबस्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसई, नालासोपारा आणि बोईसर या तिन्ही मतदारसंघांतील बुधवारी होणारी मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी परिमंडळ दोन आणि तीनमधील ११ पोलिस ठाण्यांचा तगडा पोलिस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. कायदा व सुव्यवस्था बिघडू नये यासाठी मंगळवारी रात्रीपासून नाक्यानाक्यांवर, चौकांत पोलिस तैनात असणार आहेत.

परिमंडळ-२ आणि ३ मधील ११ पोलिस ठाण्यांच्या हद्दीत बोईसर, नालासोपारा आणि वसई हे तिन्ही मतदारसंघ येतात. यामुळे तिन्ही मतदारसंघांच्या बुथवर तसेच परिसरात पोलिसांची करडी नजर राहणार आहे. अनेक ठिकाणी नाकाबंदी केली जाणार असून, दिवसभर पेट्रोलिंगही राहणार आहे. सर्व पोलिस ठाण्यांच्या पोलिस अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातून विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रूट मार्च काढलेला आहे.



जिल्ह्यात मतदानाच्या पार्श्वभूमीवर कडक पोलिस बंदोबस्त ठेवला असून यासंदर्भात अधिकारी, कर्मचाऱ्यांना पोलिस आयुक्तांनी मार्गदर्शन केले.

### असा असेल पोलिसांचा बंदोबस्त

वसई विधानसभेसाठी वसई, नायगाव, माणिकपूर, अर्नाळा आणि मुख्यालय येथील ६६ पोलिस अधिकारी, ४९४ अंमलदार आणि सीआयएसएफ व एसआरपीएफ यांचे दोन प्लाटून यांचा बंदोबस्त लावण्यात आला आहे. बोईसर विधानसभेसाठी पेल्हार, मांडवी, वालीव, मुख्यालय आणि गुजरात राज्य येथील एक सहायक पोलिस आयुक्त, सात पोलिस निरीक्षक, ३९ पोलिस अधिकारी, २६१ पोलिस अंमलदार, ११९ होमगार्ड, ३५ मसुब आणि १३ नागरी संरक्षण दलाचे कर्मचारी, असा बंदोबस्त नेमण्यात आला आहे. नालासोपारा विधानसभेसाठी नालासोपारा, बोळींज, विरार, तुळींज, आचोळे, मुख्यालय आणि गुजरात राज्य येथील एक सहायक पोलिस आयुक्त, सहा पोलिस निरीक्षक, ७२ पोलिस अधिकारी, ६२५ पोलिस अंमलदार, ३७२ होमगार्ड आणि ६१ मसुब असा तगडा बंदोबस्त नेमण्यात आला आहे.

पुण्यनगरी पा.नं. II

# घोडबंदर रोडवर जड, अवजड वाहनांना बंदी

**ठाणे :** ठाण्याच्या घोडबंदर रोडवरील मतदान केंद्रावर मतदान मशीन आणि इतर साहित्य आणण्यासाठी १९ ते २१ नोव्हेंबर काळात कासारवडवली उपवाहतूक विभागाने अधिसूचना काढत जड आणि अवजड वाहनांना घोडबंदर रोडवर प्रवेशबंदी केली आहे.

ठाण्याच्या घोडबंदर रोडवरून मुंबईकडून ठाण्याकडे जाणाऱ्या जड, अवजड वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आलेली आहे. गुजरातकडून घोडबंदर रोडच्या दिशेने ठाण्याकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांना चिंचोटी नाका प्रवेश बंद करण्यात आलेला आहे. तर दुसरीकडे मुंबई, वसई, विरारकडून घोडबंदर रोडच्या दिशेने ठाण्याकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांना फाऊंटन हॉटेलजवळ प्रवेश बंद करण्यात आला आहे. तसेच घोडबंदर रोडने ठाण्याकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांना गायमुख जकात नाका येथे प्रवेश बंद करण्यात आलेला आहे. या वाहनांना इच्छित स्थळी जाण्यासाठी पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आलेले आहेत. गुजरात, मुंबई, विरार, वसईकडून घोडबंदर रोडच्या दिशेने येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांना चिंचोटी नाका येथून कामण, अंजूर फाटा, माणकोली भिवंडी मार्गे इच्छित स्थळी जाता येईल.


मुंबई-नाशिक वाहिनीवरील ज्युपिटर हॉस्पिटलसमोरील माजिवडा ब्रिजवरील वाय जंक्शन येथून उजवीकडे वळण घेऊन ही वाहने पुढे सरळ जाऊन खारेगाव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

NBT पा.नं. 8

# मुंबई-अहमदाबाद हाइवे की दुर्दशा पर बोलना भूले नेताजी!

## जगह-जगह अधूरे पड़े निर्माण कार्यों के चलते लोगों की जान जोखिम में

■ सुरेंद्र नेगी, वसई



ठेकेदार की लापरवाही के कारण लोगों का हाइवे पर चलना हुआ मुहाल

**विधानसभा के** इस चुनावी समर मे जिले की छह सीटो पर चुनाव हो रहे है। चुनाव प्रचार के दौरान शहर की समस्याओ को लेकर सभी पार्टियो के उम्मीदवारो ने एक-दूसरे पर जमकर आरोप-प्रत्यारोप लगाए, लेकिन पिछले एक साल से मुंबई-अहमदाबाद हाइवे पर तरह-तरह की समस्याएं झेल रहे लोगो के बारे मे किसी भी पार्टी के नेता ने अब तक कुछ नही कहा। लोगो का कहना है कि वे अब भी 6-6 घंटे ट्रैफिक जाम की समस्या से जूझ रहे है। जगह-जगह अधूरे निर्माण कार्य लोगो के लिए जानलेवा साबित हो रहे हैं। हाइवे पर दिनभर लोग धूल-मिट्टी और जाम से परेशान हो रहे है। आमजन का आरोप है कि ठेकेदार द्वारा कार्य के दौरान भारी लापरवाही बरती जा रही है और यही लोगों के लिए मुसीबत का सबब बन रही है।

**गड्ढों से निजात पाने वाइट टॉपिंग बनाने का लिया था निर्णय :** गौरतलब है कि हाइवे पर गड्ढों और जलभराव से छुटकारा पाने के लिए एनएचएआई ने मुंबई-अहमदाबाद हाइवे पर गुजरात बॉर्डर के तलासरी से लेकर काशीमीरा तक वाइट टॉपिंग (कॉन्क्रीट) बनाने का निर्णय लिया, जिसके लिए 621 करोड़ रुपये का बजट भी पास किया गया था। फरवरी- 2024 में इस काम का ठेका निर्मल बिल्ड इंफ्रा नामक कंपनी को दिया गया, लेकिन हाइवे पर वाइट टॉपिंग में बरती जा रही लापरवाही के कारण वहां से गुजरने वाले पिछले आठ महीनों से परेशान हो रहे हैं। बड़ी बात ये है कि वाइट टॉपिंग के दौरान जगह-जगह अधूरे पड़े निर्माण कार्यों की वजह से कई हादसे हुए और इन हादसों में अब तक 60 से अधिक लोग अपनी जान गंवा चुके हैं।

**60**
से अधिक लोग अधूरे पड़े निर्माण कार्यों के चलते हादसों में जान गंवा चुके है

**621**
करोड़ रुपये का बजट एनएचएआई ने निर्माण कार्य के लिए पास किया था

**2024**
फरवरी में इसका ठेका निर्मल बिल्ड इंफ्रा कंपनी को दिया गया

### 7-8 घंटे का जाम बनी रोजमर्रा की समस्या

**अधूरे निर्माण** कार्यों की वजह से 7-8 घंटे का जाम लोगों के लिए तो जैसे आम बात हो गई है। पिछले आठ महीनों से हाइवे की दुर्दशा से लोग परेशान हैं। बता दें कि बारिश के समय हाइवे पर बने गड्ढे, कीचड़ और मलबा लोगों के लिए जानलेवा बन गए थे। अब निर्माण कार्य के दौरान उड़ रही धूल-मिट्टी लोगों का दम घोट रही है।

### दोपहिया वाहनों से सफर करना चुनौतीपूर्ण

**हाइवे पर** दोपहिया वाहनों से सफर करना किसी चुनौती से कम नही है। मुंबई से गुजरात जाने वाली दिशा मे एक लाइन पर वाइट टॉपिंग हुई है और दो लाइन अधूरी है, जिसके कारण आए दिन दोपहिया वाहन हादसो का शिकार हो रहे हैं। रात के समय अंधेरा होने के कारण सड़क के ऊपर-नीचे का लेवल लोगों को समझ नही आता, जिससे दुर्घटनाएं हो रही हैं।

“ प्रचार के दौरान सभी पार्टी के नेताओं ने विकास कार्यों को लेकर एक-दूसरे पर आरोप लगाए। पिछले आठ महीनों से हाइवे पर सफर मुहाल हो गया है, लेकिन इस दुर्दशा पर किसी भी नेता ने कुछ नहीं बोला।

*- चन्द्रशेखर गुप्ता, स्थानीय निवासी*

“ दिवाली और विधानसभा चुनाव के कारण निर्माण कार्य में रुकावट आई है। जल्द ही सभी समस्याओं को ध्यान में रखते हुए कार्य किया जाएगा। कुछ जगहों पर ट्रैफिक की समस्या हो रही है।

*- सुमित कुमार, अधिकारी एनएचएआई*

### सात साल की बच्ची के साथ दुष्कर्म, केस दर्ज

■ निसं, नालासोपारा: आचोले पुलिस स्टेशन क्षेत्र मे रहने वाली सात साल की बच्ची के साथ पड़ोस में रहने वाले 16 वर्षीय किशोर ने दुष्कर्म किया है। पीड़ित बच्ची की मां की शिकायत पर पुलिस ने मामला दर्ज किया है। पीड़ित बच्ची की मां ने आरोप लगाया है कि सोमवार सुबह 11 बजे उनकी 7 साल की बच्ची घर के बाहर खेल रही थी। तभी पड़ोस में रहने वाला किशोर उसे अपने घर ले गया और बच्ची के साथ दुष्कर्म किया।

### नालासोपारा में किया नाबालिग का रेप

■ निसं, नालासोपारा: पेल्हार पुलिस स्टेशन क्षेत्र में रहने वाली मानसिक रूप से कमजोर एक नाबालिग लड़की से एक शख्स ने दुष्कर्म किया है। पीड़ित लड़की के परिजनों की शिकायत पर पुलिस ने मामला दर्ज कर आरोपी को गिरफ्तार कर लिया है। पीड़िता की मां ने आरोप लगाया कि उसकी 17 वर्षीय बेटी के साथ जुलाई में एक शख्स ने अलग-अलग जगहों पर दुष्कर्म किया है। इस बीच वह चार माह की गर्भवती हुई है।

NBT पा.नं. 9.

# बीजेपी महासचिव विनोद तावडे पर रुपये बांटने का आरोप, FIR दर्ज

## नालासोपारा के होटल की घटना, विपक्ष की तावडे को गिरफ्तार करने की मांग

■ सुरेंद्र नेगी, नालासोपारा

**मंगलवार सुबह** नालासोपारा मे उस वक्त सनसनी फैल गई, जब बीजेपी के राष्ट्रीय महासचिव सचिव विनोद तावडे पर एक होटल मे रुपये बाटने का आरोप लगा। इसकी जानकारी मिलते ही बहुजन विकास आघाडी (बीवीए) के नालासोपारा सीट के उम्मीदवार क्षितिज ठाकुर अपने समर्थको के साथ होटल पहुंचे और जमकर झड़प हुई। खबर फैलने के बाद माहौल तनावपूर्ण हो गया है, इसलिए भारी पुलिस बल तैनात कर दिया गया। बीवीए ने होटल में पांच करोड़ रुपये पाए जाने का आरोप लगाया है, जबकि पुलिस की जांच मे (खबर लिखे जाने तक) 9.93 लाख रुपये पाए गए हैं। होटल मे साढ़े 4 घंटे तक हंगामा होता रहा। चुनाव आयोग की टीम के आने के बाद मामला शांत हुआ। फिलहाल पुलिस ने एफआईआर दर्ज कर जांच शुरू कर दी है।

जानकारी के अनुसार, मंगलवार सुबह 11 बजे बीवीए के कार्यकर्ताओ को सूचना मिली कि नालासोपारा (पूर्व) मोरेगांव तालाव के पास स्थित वेदांता होटल मे बीजेपी के राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे कार्यकर्ताओ को रुपये बांट रहे हैं, जिसके बाद बीवीए के कार्यकर्ता होटल पहुंचे और तावडे सहित जिलाध्यक्ष महेंद्र पाटील का रुपये बांटते हुए मोबाइल से विडियो बनाने लगे। होटल के अंदर लगभग दो सौ लोग मौजूद थे और उतने ही लोग होटल के बाहर जमा थे।

### हितेंद्र ठाकुर ने किया मामला शांत

इस बीच क्षितिज ठाकुर ने विनोद तावडे से बैग और डायरी छीनकर पुलिस के सुपुर्द कर दी। बीवीए के कार्यकर्ताओ ने शिवसेना (शिंदे गुट) के नेता सुदेश चौधरी की पिटाई कर दी। चुनाव आयोग की टीम के आने के बाद हितेंद्र ठाकुर भी वहा पहुचे, जिसके बाद मामला शात हुआ। अपने कार्यकर्ताओ का गुस्सा देखते हुए हितेंद्र ठाकुर तावडे को अपनी कार मे बैठाकर ले गए। वही, तावडे ने कहा कि वह नालासोपारा विधानसभा क्षेत्र के कार्यकर्ताओ से मीटिंग करने आए थे। चुनाव आयोग को सीसीटीवी फुटेज की जांच करनी चाहिए।

❝ मोदी जी, ये पांच करोड़ रुपये किसके 'सेफ' से निकाले हैं? जनता का रुपया लूटकर किसने टेपो में भेजा है आपको। - *राहुल गांधी, नेता प्रतिपक्ष*

❝ विनोद तावडे के ऊपर लगे आरोप गंभीर है, इसलिए उन्हें तुरंत गिरफ्तार करके आगे की जांच करनी चाहिए।

*- रमेश चेन्निथला, महाराष्ट्र कांग्रेस प्रभारी*

❝ मेरे ऊपर लगे सभी आरोप बेबुनियाद हैं। मैं खुद चाहता हूं कि चुनाव आयोग सीसीटीवी के जरिए इस मामले की जांच कर सही स्थिति सामने लाए। - विनोद तावडे



नालासोपारा कैश विवाद से जुड़ा विडियो सोशल मीडिया पर वायरल हो रहा है, जिसमें बीजेपी नेता तावडे मौजूद है।



### यह हमारे विरोधियों का रचा गया एक षड्यंत्र है : फडणवीस

विनोद तावडे तो कार्यकर्ताओ से मिलने के लिए होटल गए थे। इस मामले मे वह किसी भी तरह दोषी नहीं है। विरोधी अपनी पराजय देखकर ऐसी हरकत कर रहे हैं। तावडे पर योजनाबद्ध तरीके से हमला किया गया। हमारे उम्मीदवार राजन नाईक के साथ मारपीट की गई। यह हमारे विरोधियों का रचा गया एक षड्यत्र है।

### बीजेपी व बविआ नेताओं के खिलाफ मामला दर्ज


चुनाव से एक दिन पहले निर्वाचन क्षेत्र मे अवैध रूप से प्रवेश करने के आरोप मे बीजेपी नेता विनोद तावडे के खिलाफ आचार सहिता उल्लघन का मामला दर्ज किया गया है। मुख्य निर्वाचन अधिकारी और पालघर जिला कलेक्टर गोविंद बोडके ने बताया कि होटल के कमरे मे नकदी पाए जाने पर राजन नाईक सहित कार्यकर्ताओं और मारपीट के आरोप मे विधायक क्षितिज ठाकुर व अन्य पर भी मामला दर्ज हुआ है।

FREE PRESS JOURNAL e-Paper

WEDNESDAY, NOVEMBER 20, 2024, 07.30 AM

# "Maharashtra Elections 2024: MBVV Police Deploy Over 3,240 Personnel For Free And Fair Polling, Arms Deposited To Ensure Law & Order".

As the electorate gears-up to vote in the state assembly elections on Wednesday (20, November), the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police have chalked out their plans to ensure that the polling process takes place in a free and fair manner.



Mira-Bhayandar: As the electorate gears-up to vote in the state assembly elections on Wednesday (20, November), the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police have chalked out their plans to ensure that the polling process takes place in a free and fair manner.

More than 3,240 police personnel have been assigned poll duty to avoid any untoward incident in the Mira Road-Virar belt which has five assembly constituencies including three falling in Palghar district. Headed by MBVV chief- Madhukar Pandey, the security personnel to be deployed include-five DCP's, 12 ACP's, 386 officers, 2,840 constables and head constables.

This apart from 1,240 home guards, 88 police volunteers along with five companies of the central industrial security force (CISF) /state armed police (SAP) and a company from the state reserve police force (SRPF) have been deployed.

Additionally, five reserved striking units will also be on a high alert mode. A total of 1,776 polling stations are housed in 449 structures across all the five assembly constituencies including- Boisar (131), Nallasopara (132), Vasai (133), Mira-Bhayandar (145) and Ovala-Majiwada (146) having a collective voter strength of 24,30,479 as on 30, October, 2024.

Personnel from the cyber cell have been deputed to keep a close eye on fake news and objectionable content on social media platforms and take immediate action against trouble mongers.

Any kind of violation of the model code of conduct or suspicious activities can be reported directly to the local police stations or on 022-35006130, 29452135 and 7021995352.

**175 Arms Deposited, 4 Impounded.**

Responding to the directives issued by the state election commission (SEC), 154 out of the 201 arms holders in the MBVV police Commissionerate jurisdiction have deposited their licensed weapons at their respective police stations after the model code of conduct came into force in the state on 15, October for the assembly elections.

While 22 arms were deposited and their licenses cancelled, four weapons have been impounded till 19, November. 21 arms holders fall under the exempted category such as public/ private sector banks and their security agencies.

----000----